**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २५ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

- **राज्यातील पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी घेतला आपत्कालीन यंत्रणांचा आढावा.**
- **केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दहाव्या कम्युनिटी रेडियो पुरस्कारांची केली घोषणा- सांगलीच्या येरलावाणी वरील 'कहाणी सुनंदाची' कार्यक्रमाला प्रथम पुरस्कार.**
- **महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पामध्ये नागपूरच्या केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्थेची 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून निवड.**
- **पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा उदघाटन सोहळा उद्या- तत्पूर्वी आज भारतीय महिला तिरंदाजी संघाने गाठली उपांत्यपूर्व फेरी.**
- **केन्द्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर तर्फे 'कारगिल विजय दिवस - रौप्य जयंती' निमित्त दोन दिवसीय मल्टिमीडिया फोटो प्रदर्शनाचं उद्या उदघाटन.**

****

पूरसदृश्य परिस्थिती

राज्यात ज्या-ज्या ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती आहे तिथले बचाव कार्य वेगानं सुरु असून, काळजीचं कारण नाही, मात्र नागरिकांनी देखील आवश्यकता नसल्यास घराच्या बाहेर पडू नये असं आवाहन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या, लष्कर, नौदल, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य यंत्रणा या सर्वांना एकमेकात समन्वय ठेवून आवश्यकतेप्रमाणे मदत करण्याचे निर्देश देण्यात आल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, मुंबई, पुणे, ठाणे शहरांसह राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी मंत्रालयात आपत्कालीन नियंत्रण कक्षात भेट देऊन आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांना परस्पर समन्वय ठेवून बचत आणि मदतकार्य करण्याचे निर्देश पवार यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांनी देखील पावसाचा आढावा घेऊन, प्रशासनाला

सतर्क राहण्याचे आदेश दिले. पुण्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहनही फडणवीस यांनी केलं आहे.

कम्युनिटी रेडिओ

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दहाव्या कम्युनिटी रेडियो पुरस्कारांची घोषणा केली. आयझॉल इथल्या अपना रेडिओ या पाचशेव्या कम्युनिटी रेडियो स्टेशनचं उद्घाटनही वैष्णव यांच्या हस्ते झालं. आयझॉल येथील भारतीय जनसंवाद संस्था (IIMC) द्वारे हे स्टेशन चालवले जाणारे आहे. भारताच्या सामुदायिक रेडिओ प्रवासातील हा मैलाचा दगड आहे असे सांगत वैष्णव म्हणाले की, हा उपक्रम अपना रेडिओ स्टेशनच्या कव्हरेज क्षेत्रातील लोकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणेल. याची सुरुवात हा सरकारच्या ऍक्ट ईस्टच्या धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे असही वैष्णव म्हणाले. विविध श्रेणींत घोषित करण्यात आलेल्या या पुरस्कारांत 'सर्वाधिक नवोन्मेषी सामुदायिक सहभाग पुरस्कार' श्रेणीत महाराष्ट्रातील सांगलीच्या येरलावाणी वरील 'कहाणी सुनंदाची' कार्यक्रमाला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

संसद

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देशानं दिलेल्या जनादेशाचा अपमान केल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज केली. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. विरोधी पक्षांनी अर्थसंकल्पावर कोणतंही भाष्य न करता, केवळ राजकारण केल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान काल भाजपा सदस्य अभिजित गंगोपाध्याय यांनी केलेल्या वक्तव्या विरोधात काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसनं आज आक्षेप नोंदवला. सकाळी सदनाचं कामकाज सुरु झाल्यावर काँग्रेस आणि टीएमसीच्या सदस्यांनी गंगोपाध्याय यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करत हा मुद्दा उपस्थित केला. गंगोपाध्याय यांना त्यांच्या वक्तव्याबद्दल इशारा देण्यात आल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं.

आदिती तटकरे

राज्यातल्या महिला बचतगटांना प्रोत्साहन देण्यासाठी महानगरातील शासकीय कार्यालयाच्या आवारात बचत गटांना जागा उपलब्ध करुन, त्यांच्या उद्योग वाढीसाठी प्रोत्साहन द्यावं, असे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती

तटकरे यांनी दिले. काल मुंबईत यासंदर्भातल्या बैठकीत त्या बोलत होत्या. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महानगरांमध्ये महिला बचत गटांच्या उद्योगवाढीसाठी अधिक प्रोत्साहन मिळावे, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचं तटकरे यांनी यावेळी नमूद केलं.

विजय वडेट्टीवार

अतिवृष्टीमुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला असून शेतकऱ्यांना सरकारने भरीव मदत करावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. हवामान खात्याचा अंदाज आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी आज माध्यम प्रतिनीधींशी संवाद साधला. नागरिकांनी जीव धोक्यात घालून घराबाहेर पडू नये, असं आवाहन देखील त्यांनी केलं.

नाना पटोले

भारतीय जनता पक्षाचे सरकार हे सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना संपवण्याचे काम करते हे उघड आहे. आपल्याकडे विरोधकांच्या ऑडिओ, व्हिडिओ क्लिप आहेत त्या उघड करेन असं देवेंद्र फडणवीस धमकावत आहेत, असा आरोप करत फडणवीस यांनी क्लिप असतील तर कारवाई करावी, असं प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केलं आहे.नागपूर इथं प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना राज्यातील, ड्रग्ज, भ्रष्टाचार आदी मुद्यांवर पटोले यांनी सरकारवर टीका केली. नागपूर, भंडारा, गोदिया, कोल्हापूर, पुणे इथं पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. राज्यात कोठेही संकट ओढवलं तर तात्काळ यंत्रणा पोहचल्या पाहिजेत, याकडे सरकारने लक्ष द्यावं, असंही नाना पटोले म्हणाले.

केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था नागपूर

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पामध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था, नागपूर यांची सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून निवड करण्यात आलेली आहे. याबाबतचा सामंजस्य करार २३ जुलै रोजी नागपूर इथं करण्यात आला. मॅग्नेट प्रकल्पाच्यावतीने प्रकल्प संचालक विनायक कोकरे आणि केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था, नागपूच्यावतीने संचालक डॉ. दिलीप घोष यांनी करारावर स्वाक्षरी केली. मॅग्नेट प्रकल्पात घटक-१ अंतर्गत विविध शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आणि विस्तार विषयक कर्यक्रम राबविण्यात येतात. यामध्ये प्रशिक्षकांचे प्रशिक्षण,

शेतकरी उत्पादक संस्थांची संस्थात्मक बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम, उत्तम कृषी पद्धती, काढणीपश्चात  व्यवस्थापन, इत्यादी प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे. या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी पायाभुत सुविधा उपलब्ध असतील, अशा संस्थाची सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून निवड करण्यात येते.

राज ठाकरे

आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना २२५ ते २५० जागा लढवणार आहे. यावेळच्या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सत्तेत बसवणार असल्याचं  प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलं . आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर  मुंबईत आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. आपण  १ ऑगस्ट पासून राज्याचा दौरा करणार असल्याचं  ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा उदघाटन समारंभ उद्या होणार असून, त्यापूर्वी, आज तिरंदाजी स्पर्धेला सुरुवात झाली. आज तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव यांच्यासह  दीपिका कुमारी, अंकिता भकट, भजन कौर, आणि बी. धीरज, हे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झालेत. भारतीय महिला तिरंदाजी संघ आज चौथ्या स्थानावर राहून पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला आहे. उपांत्यपूर्व फेरीत भारताचा सामना यजमान फ्रान्स आणि नेदरलँड यांच्यातील अंतिम विजेत्याशी होईल. आज वैयक्तिक फेरीत  अंकिताने ११ वे, भजन ने २२ वे तर दीपिकाने २३ वे स्थान प्राप्त केले. पुरुषांची रँकिंग फेरी संध्याकाळी पावणे सहा वाजता सुरु झाली आहे. स्पर्धेचे पुढले टप्पे २८ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत होणार आहेत. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये तिरंदाजीच्या पाचही स्पर्धांमध्ये भारत सहभागी होणार आहे. स्पर्धेसाठी भारताचे एकूण १२८ तिरंदाज पात्र ठरले असून, यामध्ये ६४ महिला आणि ६४ पुरुष खेळाडूंचा समावेश आहे. यापैकी प्रवीण जाधव हे  सातारा जिल्ह्यातील सराडे गावातील एका रोजंदारी करणाऱ्या कुटुंबातून येतात. अमरावती येथून प्रशिक्षण घेतल्यानंतर २०१९ च्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत त्यांना सांघिक रौप्य पदक मिळालं. आज पर्यंत प्रवीणने  आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकूण 2 सुवर्ण आणि 2 रौप्य पदके जिंकली आहेत.

कारगिल विजय दिवस

उद्या २६ जुलै  रोजी कारगिल विजयाला २५ वर्षे पूर्ण होतील. या युद्धात आपल्या शौर्य आणि पराक्रमानं भारताला विजय मिळवून देणाऱ्या शूर सैनिकांच्या सन्मानार्थ, भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या केन्द्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर आणि  व्हीएमव्ही वाणिज्य, जे.एम.टी.कला आणि जे.जे.पी. विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानं २६ आणि २७ जुलै  रोजी महाविद्यालय प्रांगणात 'कारगिल विजय दिवस-रौप्य जयंती' या विषयावर दोन दिवसीय मल्टिमीडिया फोटो प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्या सकाळी 10:30 वाजता होणाऱ्या उद्घाटन समारंभात निवृत्त एअर व्हाईस मार्शल सुर्यकांत चाफेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. तर परवा समारोप सत्रात निवृत्त मेजर जनरल एपी बाम यांची उपस्थिती राहील. या छायाचित्र प्रदर्शनात कारगिल युद्धाशी संबंधित दुर्मिळ छायाचित्रे पाहायला मिळतील, तसेच युद्धात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद कॅप्टन विक्रम बत्रा यांच्यासह इतर सैनिकांबद्दल आणि युद्धात वापरलेल्या शस्त्रास्त्र तसच उपकरणांबद्दल माहिती दर्शकांना मिळेल. हे प्रदर्शन सर्व विद्यार्थी आणि नागरिकांसाठी नि:शुल्क उपलब्ध असेल.

हवामान

विदर्भात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पाऊस पडतो आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून यवतमाळ आणि नागपूर मध्ये देखील पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्यापासून  येत्या सोमवार पर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान, गेल्या 24 तासात चंद्रपूर जिल्ह्यात मूल इथं सर्वाधिक 140 पूर्णांक 5 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे तर गडचिरोली येथे 132 पूर्णांक 8 मिलिमीटर पावसाची नोंद तसंच वर्धा जिल्ह्यात देवळी  येथे 83 पूर्णांक 5 मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तत्पूर्वी, प्रादेशिक हवामान खात्याने चंद्रपूर जिल्ह्यात पुढील काही दिवस जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार वर्धा नदीच्या पात्रात पाण्याची वाढ झाल्यामुळे सायंकाळपर्यंत राजुरा-हैद्राबाद राष्ट्रिय महामार्ग वाहतुकीसाठी बंद  केला जाऊ शकतो. जिल्ह्यातील वर्धा, अंधारी, ईराई अश्या नद्यांच्या आणि धरणांच्या जलाशय साठ्यात प्रचंड वाढ झाल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग होऊ शकतो. त्यामुळे नदी, तलाव शेजारी नागरिकांना प्रशासनाच्या वतीने सुरक्षित स्थळी

हलविण्याचे काम जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुरू आहे. वाशिम जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून संतत धार सुरू असलेल्या पावसाने वाशिम जिल्ह्यातील सोनल प्रकल्प ओसंडून वाहत आहे.

*****